| MHAM200001642025 | **<u>जिल्हा न्यायालय दर्यापूर जि.अमरावती यांच्या न्यायालयात</u>**<br>( पिठासीन अधिकारी सत्यवान तुळशिराम डोके )<br>(दिनांक ३० एप्रिल २०२६)<br>**सत्र प्रकरण क्र. ९२/२०२५ (जूना क्र ५१/२०२४)**<br>छापील फिर्याद **३२८/२०२३ पोलीस ठाणे येवदा** |
|---|---|
| फिर्यादी सदाशिव गोंडूजी सोळंके | **महाराष्ट्र शासन मार्फत**<br>पोलीस ठाणे अधिकारी<br>येवदा ता. दर्यापूर जि अमरावती |
| फिर्यादीतर्फे : | **श्री एस बी पल्लोड सहायक सरकारी अभियोक्ता** |
| **आरोपी** : | **१. प्रेमदास रामदास रायबोले (मयत)**<br>**२. बेबी रामदास रायबोले**<br>वय ६० वर्ष व्यवसाय मजूरी<br>३. **गं.भा. पद्मा प्रकाश अभ्यंकर**<br>वय ४० वर्ष व्यवसाय शेती<br>दोघे रा. भामोद ता ता दर्यापूर |
| आरोपीतर्फे : | **श्री देशपांडे अधिवक्ता** |
| घटना तारीख : | १६.११.२०२३ |
| छापील फिर्याद तारीख : | २९.१२.२०२३ |
| दोषारोप दाखल तारीख : | ०७.०३.२०२४ |
| दोषनिश्चिती तारीख : | ०८.०४.२०२५ |
| पूरावा प्रारंभ तारीख : | २०.११.२०२५ |
| निकाल तारीख : | ३०.०४.२०२६ **०२ वर्षे ०१ महिने २३ दिवस** |

**आरोपीचा तपशिल :**

| | **आरोपीचे नाव** | **अटक दिनांक** | **जामीनवर सूटण्याची तारीख** | **गून्हा** | **निर्दोष / शिक्षा** | **शिक्षेचे स्वरूप** | **बंदिस्त आरोपीचा कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | **बेबी रामदास रायबोले** | ३०.१२.२३ | १७.०१.२०२४ | ४९८ व ३०६,३४ भादवि | निर्दोष | .. | .. |
| ०२ | **गं.भा. पद्मा प्रकाश अभ्यंकर** | ३०.१२.२३ | १७.०१.२०२४ | ४९८ व ३०६,३४ भादवि | निर्दोष | .. | .. |

## पार्ट ‘‘सी’’

[Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual]

| अनू क्र | साक्षीदारांची नावे | साक्षीचे स्वरूप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | उषा बापुराव तायडे निक्र २६ | फिर्यादी |
| सा.क्र.२ | किशोर बापुराव तायडे निक्र २९ | साक्षीदार |
| सा.क्र.३ | पद्माकर उत्तमराव इंगळे निक्र ३० | साक्षीदार |
| सा.क्र.४ | रूतुजा प्रेमदास रायबोले निक्र ३७ | साक्षीदार |
| सा.क्र.५ | रूद्र प्रेमदास रायबोले निक्र ३८ | साक्षीदार |

## दस्ताऐवज

| अनू क | दस्ताऐवज | नि क |
|---|---|---|
| ०१ | फिर्याद आणि छापील फिर्याद | पी–२७ आणि २८ |
| ०२ | घटनास्थळ पंचनामा | ३५ |
| ०३ | मर्ग डायरी | ३६ |
| ०४ | इन्क्वेस्ट पंचनामा | ३३ |
| ०५ | शव विच्छेदन अहवाल | ३४ |

**ब. बचावपक्षाचे :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| - | - | - |

**क. न्यायालयाचे निशाणी :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| - | - | - |

## ड. मुद्देमाल :

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | **वर्णन** |
|---|---|---|
| ०१ | जळालेले कपडयाचे तुकडे | आर्टीकल ए |
| ०२ | डबकी | आर्टीकल बी |
| ०३ | माचिस | आर्टीकल सी |

**न्यायनिर्णय**
**(दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी पारीत)**

सदर प्रकरणातील आरोपी हे फिर्यादी उषा बापुराव तायडे हिने दाखल केलेल्या तक्रारीवरून आरोपी हे भारतीय दंड विधान कायदा कलम ४९८ व ३०६ सह कलम ३४ अंतर्गत संपरिक्षेचा सामना करीत आहे.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात हकिकत अशी आहे की,**

२. फिर्यादी ही पोही शेकापुर ता अंजनगाव सुर्जी येथे तिच्या मुलासह राहण्यास असुन शेत मजुरीचे काम करते. तिला एक मुलगी सौ रेष्मा प्रेमदास रायबोले असुन तिचे लग्न १५ वर्षापुर्वी सन २००८ मध्ये प्रेमदास रायबोले यांच्या सोबत त्यांच्या जाती रिवाजाप्रमाणे झाले होते. फिर्यादीची मुलगी रेष्मा, तिचे पती प्रेमदास, तिची मुलगी परी, मुलगा रूद्र, प्रेमदासची आई आरोपी क्र २ बेबी आणि नणंद आरोपी क्र ३ पद्मा यांच्या सोबत भामोद येथे राहण्यास होती. लग्न झाल्यापासुन फिर्यादीच्या मूलीला तिचे पती, सासु आणि नणंद हे नेहमी त्रास देत होते. छोटया छोटया कारणावरून तिला मारहाण करीत होते. सदर बाब फिर्यादीच्या मूलीने त्यांना व त्यांच्या मूलाला सांगितली होती. परंतु रेषमाला दोन मूले असल्याकारणाने ती सहन करीत होती. माझया मूलीने आरोपी प्रेमदास विरूध्द अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात बरेच वेळा रिपोर्ट दिले होते. महिला दक्षता समिती अंजनगाव सुर्जी येथे समझौता सुध्दा झाला होता तरी सुध्दा प्रेमदास रायबोले हा फिर्यादीच्या मयत मुलीसोबत वाद करीत होता व तिला मारहाण करीत होता.

३. दिनांक १०.११.२०२३ रोजी सकाळी ७.३० वाजता फिर्यादीला तिची मूलगी रेषमा हिचा त्यांच्या मूलाच्या मोबाईलवर फोन आला व तिने सांगितले की, तिचे पती, सासु आणि नणंद हे खुप मारहाण करीत आहे व तुम्ही घ्यायला या. त्यानंतर फिर्यादी व तिचा मुलगा दिनांक १६.११.२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता भामोद येथे मुलीला भेटण्याकरिता गेले असता तेथे जावई प्रेमदास रायबोले, सासु बेबी रायबोले आणि नणंद पद्मा या हजर होत्या. तेथे गेल्यानंतर फिर्यादीने मुलीला झालेल्या मारहाणीबाबत प्रेमदास याला जाब विचारला असता त्याने फिर्यादीला शिवीगाळ केली व तुम्ही मधात पडाल किंवा माझया मधात जर तुम्ही आले तर तुम्हाला सुध्दा मारहाण करीन व जिवाने मारून टाकीन अशा धमक्या दिल्या. त्यानंतर त्यांनी मुलीची भेट घेतली व तिला समजावुन सांगुन घरी परतले.

४. दिनांक २९.१२.२०२३ रोजी सकाळी ११.३०वाजता फिर्यादी व तिचा मुलगा किशोर तायडे असे मजुरीच्या कामाने सुधीर जुनघरे यांच्या शेतात गेले होते तेव्हा त्यांच्या मूलाचे मोबाईल वर तिचा जावई प्रेमदास रायबोले याचा फोन आला व त्यांनी मूलाला सांगितले की, तुमच्या बहिनीची तब्येत खराब झाली आहे तिला दर्यापुर येथे डॉ नागे हॉस्पीटल येथे घेवून जात आहे. त्यानंतर सुमारे एक तासाने प्रेमदास रायबोले यांचा परत फिर्यादीच्या मुलाच्या मोबाईलवर आला की, तुमच्या मुलीने फाशी घेतली आहे तिला दर्यापुर येथील डॉ नागे यांच्या हॉस्पीटलमध्ये आणले आहे. त्यांनतर फिर्यादी व तिचा मूलगा किशोर लगेच गाडीने दर्यापुर येथे डॉ नागे यांच्या हॉस्पीटलमध्ये गेले. त्यावेळी डॉक्टर व कर्मचारी त्यांच्या मुलीला स्ट्रेचर वर ठेवुन ॲम्बूलन्समध्ये टाकत होते. त्यावेळी त्यांची मूलगी मयत झाली होती. त्यानंतर मूलीला पोस्ट मार्टम करता सरकारी दवाखान्यात आणले. आरोपींनी फिर्यादीला मूलीला शारिरीक व मानसिक त्रास दिला व मारहाण केली त्यामुळे त्याला कंटाळुन फिर्यादीच्या मुलीने आत्महत्या केली अशा आशयाची फिर्याद फिर्यादीने पोलीस ठाण्यात दाखल केली.

५. फिर्यादीने दिलेल्या तोंडी फिर्यादवरून आरोपीविरूध्द येवदा पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधानचे कलम ४९८ आणि ३०६ सह कलम ३४ अंतर्गत गून्हयाची नोंद मपोहेका स्मीता बांगरे यांनी नोंदविला. सदर प्रकरणात सफौ उमेश जयस्वाल यांनी इन्क्वेस्ट पंचनामा

तयार केला, डॉ एस बी डाबेराव यांनी शवविच्छेदन करून त्याचा अहवाल दाखल केला. तसेच पोना रविन्द्र धानोरकर यांनी मर्ग दाखल केला. त्यानंतर पुढील तपास पोउप निरीक्षक वसंत शिंदे यांनी करून साक्षीदारांचे बयाण नोंदविले व दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले.

६. सदर प्रकरणात आरोपी क्र १- प्रेमदास रायबोले हा संपरिक्षेदरम्यान मरण पावल्याने त्याच्याविरूध्द सदरचे प्रकरण संपूष्टात आले आहे. आरोपी क्र. २ आणि ३ न्यायालयात उपस्थित झाल्यानंतर निशाणी क्र.७० वर दोषनिश्चिती करण्यात येवुन नि क्र २१ व २२ प्रमाणे त्यांनी दोषारोप कबुल नसल्याचे सांगितले म्हणुन आरोपींविरुध्द सदर खटला चालविण्यात आला. आरोपी क्र २ व ३ चे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये निवेदन निशाणी क्र. ४३ आणि ४४ प्रमाणे नोंदविण्यात आले. आरोपींनी आपल्या बचावाखातर सदरचे प्रकरण खोटे दाखल केले असल्याचा बचाव घेतला.

७. अभियोग पक्षातर्फे विद्वान सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच बचाव पक्षातर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाच्या कथनावरुन खालील मुद्दे या न्यायालयाच्या विचारार्थ उपस्थित झाले. सदर मुद्दयावर पुढे नमुद केलेल्या कारणमिमांसे वरुन खालील निष्कर्ष नोंदविण्यात आले आहेतः-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्ष हे सिध्द करीत आहे का की, दिनांक १६.११.२०२३ ते २९.१२.२०२३ रोजी व त्यापूर्वी ग्राम भामोद येथे आरोपी क्र २ व ३ व मयत आरोपी क्र १ यांनी सामाईक हेतूपूर्तीकरिता मयत रेषमा हिला जाणूनबूजन गैरवर्तवणूक दिली, तिच्यावर हल्ला करून कूरता आणि छळ केला व तेच पैश्याची मागणी करून तिचा मानसिक व शारिरीक छळ केला आणि त्यायोगे भारतीय दंड विधान कायदा कलम ४९८ सह कलम ३४ अन्वये गून्हा केला ? | ....नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोगपक्ष हे सिध्द करत आहे का की, उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी सामाईक हेतूपूर्तीकरिता मयत रेषमा हिला मानसिक व शारिरीक त्रास देवून तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले व त्यायोगे भारतीय दंड विधार कायदा कलम ३०६ सह कलम ३४ चा गून्हा केला ? | .... नकारार्थी |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

"भारतीय दंड संहितेच्या कलम ३०६ अन्वये आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी, फिर्यादी पक्षाला खालील मुख्य घटक न्यायालयात सिद्ध करणे आवश्यक आहे"

१. सर्वप्रथम, संबंधित व्यक्तीने आत्महत्या केली हे सिद्ध झाले पाहिजे.

२.- आत्महत्येसाठी आरोपीने मृत व्यक्तीला प्रवृत्त केले, मदत केली किंवा कट रचला हे सिद्ध करणे आवश्यक आहे. 'प्रवृत्त करणे' म्हणजे मृत व्यक्तीला आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नाही अशी परिस्थिती निर्माण करणे.

३.. आरोपीचा हेतू मृत व्यक्तीला आत्महत्या करण्यास भाग पाडण्याचा किंवा प्रवृत्त करण्याचा होता, हे स्पष्टपणे दिसून आले पाहिजे. केवळ मृत्यूपूर्वी झालेले आरोप किंवा मानसिक छळ पुरेसा नाही, जोपर्यंत आरोपीचा सक्रिय सहभाग सिद्ध होत नाही.

४. आरोपीच्या कृतीमध्ये आणि मृत व्यक्तीने केलेल्या आत्महत्येमध्ये थेट आणि तात्काळ संबंध असणे आवश्यक आहे. म्हणजे, आरोपीच्या कृतीमुळेच मृत व्यक्तीने आत्महत्या केली हे सिद्ध झाले पाहिजे.

**<u>मूद्दा क्र. १ व २ करिता</u>** :-

८. सदरचे दोन्ही मुद्दे एकमेकांशी संलग्नीत असल्याने त्यांचे विवेचन एकत्रितरित्या करण्यात आलेले आहे.

९. सदर प्रकरणातील महत्वाची साक्षीदार फिर्यादी हिला अभियोग पक्षाने तपासले. साक्षीदार क्र १ उषा तायडे हिने तिच्या सरतपासात कथन केले की, तिला एक मुलगी होती व दोन मुले होते. तिच्या मूलीचे नाव रेषमा होते व तिचे लग्न प्रेमदास याच्यासोबत झाले होते. लग्नानंतर तिची मूलगी तिच्या सासरी भामोद येथे राहत होती. तिच्या सासरी तिचा पती, सासू आणि नणंद होते. तिच्या मूलीला एक मुलगा आणि एक मुलगी आहे. दिनांक १६.०१.२०२३ रोजी तिला रेष्माचा फोन आला होता. त्यानंतर ती, तिचा मुलगा भामोद येथे गेले. त्यावेळी तेथे गेल्यावर पाहिले की, तिच्या मुलीला तिच्या पतीने मारठोक केली होती. रेष्माच्या पतीला त्यांनी समजावुन सांगितले. रेषमाला दोन मूले असल्याने ती सासरी राहत होती. रेष्माच्या पतीने त्यांना शिवीगाळ केली त्यानंतर ते घरी परत गेले. दिनांक २९.१२.२०२३ रोजी ते शेतात असतांना प्रेमदास यांचा सकाळी १०.३० ते १०.४५ वाजता फोन आला व त्यांना सांगितले की, तूमच्या मूलीची तब्येत बरी नाही. त्यानंतर १० मिनीटांनी फोन आला व तिच्या मूलीने फासी घेतली असे सांगितले. त्यानंतर ते दर्यापुर येथील डॉ नागे यांच्या दवाखान्यात गेले असता तेथे त्यांची मुलगी मयत झाली होती. मुलीच्या प्रेतावरून शवविच्छेदन केल्यानंतर मुलीचे प्रेत भामोद येथे नेले. तिच्या मूलीच्या लग्नाला एकुण १५ ते १६ वर्ष झाली होती. लग्न झाल्यापासुन मूलीचा पती प्रेमदास हा मारहाण करीत होता. तिचा पती तिला मारहाण करीत असल्याची बाब तिच्या मुलीने त्यांना सांगितली होती. फिर्यादीने रिपोर्ट नि क्र पी-२७ आणि २८ प्रमाणे दाखल केला. तिच्या मूलीचे दोन्ही मुले हे भामोद येथे आहे. आरोपी क्र १ मरण पावला आहे.

१०. फिर्यादी हिचा उलट तपास घेतला असता तिने तिच्या उलट तपासात मान्य केले की, तिच्या मूलीला होणा-या त्रासाबाबत त्यांनी पोलीस ठाण्यात रिपोर्ट केला नाही. त्यांनी पूढे मान्य केले की, त्यांच्या मुलीची तब्येत बरी नसल्याने तिच्या पतीने तिला डॉ नागे यांच्या दवाखान्यात नेत असल्याबाबत फोन केला होता. त्यांनी पुढे मान्य केले की, दिनांक १६.११.२०२३ रोजी त्यांनी सांगितलेल्या घटनेचा रिपोर्ट दिला नव्हता. त्यांना

माहित नाही की, त्यांच्या मूलीला चिकीत्सक डॉ राठी यांच्याकडे उपचार चालू होता किंवा कसे.

११. सदर साक्षीदाराच्या साक्षीवरून असे दिसुन येते की, त्यांना त्यांच्या मुलीला तिच्या सासरी त्रास होत आहे याबाबत पुर्ण कल्पना होती व तसेच तिच्या मुलीने दिनांक १६.०१.२०२३ रोजी फोन केल्यावर ते तिच्या मुलीच्या घरी गेले होते व तेथे मयत रेष्माच्या पतीला समजाविण्याचा प्रयत्न केला असता त्याने त्यांना शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली होती असे कथन केले. जर सदरची बाब त्यांच्या समक्ष झाली असेल तर त्यांना त्यावेळी समजणे अपेक्षित होते की, जर मयत आरोपी प्रेमदास त्यांच्या समक्ष अशा शब्दात बोलत असेल तर त्यांच्या मूलीला तो काय त्रास देत असेल. असे असतांना सुध्दा त्यांनी त्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही किंवा पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला नाही किंवा त्यांच्या मूलीला परत आपल्या घरी आणले नाही. साधरणपणे जर सदरची बाब कोणत्याही साधारण व्यक्तीसोबत घडली असती तर एक आई म्हणुन आपल्या मुलीची जबाबदारी पार पाडणे साहजिकच होते किंवा त्याबाबत कोणते तरी पाउल उचलणे अपेक्षित होते. परंतु अभिलेखाची पडताळणी केली असता त्याबाबत कोणतेही पाउल मयत रेष्माच्या आईने किंवा तिच्या इतर नातेवाइकांनी घेतलेले दिसुन येत नाही. याकरिता मयत रेष्माच्या भावाची साक्ष पाहणे गरजेचे आहे.

१२. साक्षीदार क्र २- किशोर बापुराव तायडे याने त्याच्या साक्षीत कथन केले की, त्याच्या मोठया बहिणीचे लग्न झाले होते व ती तिच्या पतीकडे भामोद येथे राहत होती. त्याच्या बहिणीला एक मुलगा आणि एक मुलगी आहे. त्याच्या बहिणीच्या लग्नाला १५ ते १६ वर्ष झाली होती. नोव्हेंबर महिण्यात त्याला त्याच्या बहिणीचा फोन आला व तिचे पती दारू पिवुन मारहाण करीत असल्याचे सांगितले. त्यामुळे तो आणि त्याची आई भामोद येथे गेले. तेथे त्यांनी रेषमाच्या पतीला समजाविले असता आरोपी प्रेमदास हा दारू पिवुन धमकी देत होता. त्यानंतर ते घरी परत आले. दिनांक २९.१२.२०२३ रोजी ते आणि त्याची आई कामाला गेले होते त्यावेळी त्याच्या बहिणीच्या पतीचा फोन आला व रेष्माची तब्येत चांगली नाही असे सांगुन येण्यास सांगितले. त्यानंतर पुन्हा अर्धा तासाने फोन आला व त्यांना

सांगितले की, त्याच्या बहिणीने फासी घेतली आहे व तिला दर्यापुर येथील डॉ नागे यांच्या दवाखान्यात आणले आहे. त्याप्रमाणे तो आणि त्याची आई डॉ नागे यांच्या दवाखान्यात गेले असता तेथे रेष्मा मृत अवस्थेत होती. तिचे शवविच्छेदन करून तिला भामोद येथे घेवुन गेले. त्यानंतर तो आणि त्याची आई पोलीस ठाण्यात गेले व फिर्याद दाखल केली.

१३. सदर साक्षीदाराने त्याच्या उलट तपासात दिनांक १६ तारखेचा रिपोर्ट त्यांनी दिला नव्हता असे कबूल केले. तसेच त्याच्या बहिणीची तब्येत चांगली नाही तिला डॉ नागे याच्या दवाखान्यात नेत आहे असा फोन आला होता. त्याच्या बहिणीला मानसिक आजार असल्याचे व अकोला येथील अनुपकुमार राठी यांचा उपचार चालु होता त्याला माहित नाही.

१४. सदर साक्षीदाराने सुध्दा दिनांक १६ तारखेचा रिपोर्ट दिला नाही असे कबुल केले आहे. साक्षीदार क्र. २ हा मयत रेषमाचा भाउ आहे व त्याला त्याच्या बहिणीला होणा-या त्रासाबाबत पुर्ण माहिती होती व त्याच्या समक्ष दिनांक १६ तारखेला सर्व प्रकार घडला होता तरी सुध्दा त्याने भाउ या नात्याने कोणतेही पाउल उचलले नाही याबाबत शंका उपस्थित होते. तसेच सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षी दरम्यान कथन केले की, त्याच्या बहिणीच्या लग्नाला १५ ते १६ वर्ष झाले आहेत. जर मयत रेषमाच्या लग्नाला इतकी वर्ष झाली तर इतकी वर्ष ती त्रास सहन करत होती तरी सुध्दा त्यावर कोणतेही पाउल तिच्या नातेवाईकांनी का उचलले नाही याबाबत कोणतेही कथन आले नाही. तसेच घटनेच्या दिवशी अशी कोणती घटना झाली की त्यामुळे मयत रेषमाला तिचे जिवन संपवावे लागले याबाबत सुध्दा कोणतेही कथन केले नाही. अभियोग पक्षाने मयत रेष्माचा मामे भाउ साक्षीदार क्र ३ याची साक्ष नोंदविली.

१५. साक्षीदार क्र ३- पद्माकर उत्तरमराव इंगळे याने त्याच्या साक्षीत कथन केले की, तग्नानंतर मयत रेष्मा ही भामोद येथे तिच्या पतीकडे नांदत होती. दिनांक २९.१२.२०२३ रोजी तो त्याच्या शेतात असतांना त्याला किशोर तायडे याचा फोन आला की रेषमाला फासी दिली तुम्हाला दर्यापुर येथे यावे लागेल. त्यानंतर ते दर्यापुर येथे गेले व

ते येईपर्यत रेषमाचे प्रेत भामोद येथे घेवून गेले होते. रेषमाने त्याला कधी काही सांगितले नाही. रेष्माचे दोन्ही मुले त्यांच्या आजीकडे आहेत. त्यांनी त्यांच्या उलट तपासात कथन केले की त्याचे रेषमाकडे जाणे येणे नसल्याने त्यांना काही माहित नाही.

१६.          सदरचा साक्षीदार याने त्याच्या उलट तपासात सांगितले त्याला घटनेबाबत काही माहित नाही. तसेच त्याने असे मान्य केले की, मयत रेषमाने त्याला कधी काही सांगितले नाही. साक्षीदार क्र १ ते ३ यांचा पुरावा वाचला असता मयत रेषमाला एक मुलगा आणि एक मुलगी आहे. जर खरोखरच रेषमाला तिच्या पतीपासनु व इतर आरोपीकडुन त्रास असेल तर त्यांनी सदर बाब घरातील सदस्य या नात्याने पाहिली असेल. त्यामुळे त्यांचा पुरावा पाहणे गरजेचे आहे.

१७.          साक्षीदार क्र ४- रूतुजा प्रेमदास रायबोले हि अवयस्क असल्याने तिला शपथेबाबतचे गांभीर्य विचारले असता तिला शपथेचे महत्व कळते असे कथन केल्यानंतर तिचा पुरावा नोंदविण्यात आला. साक्षीदार क्र.४ ने कथन केले की, ती आरोपींना ओळखते. त्यामध्ये एक तिची आजी असुन एक आत्या आहे. प्रेमदास रायबोले हे तिचे वडिल होते. ते हयात नाही व मयत रेषमा ही तिची आई होती. तिची आई मनोरूग्ण होती. तिची आई २९ डिसेंबर  २०२३ रोजी मरण पावली. तिच्या आईने गळफास घेतला होता व तिने वरच्या मजल्यावर गळफास घेतला. त्यावेळी घरात ती, तिचा भाउ, वडिल आणि आत्या राहत होते. ज्यावेळी आईने गळफास घेतला त्यावेळी ती शाळेत गेली होती व तिच्या शेजारचे तिला सांगायला आले होते. आईने गळफास घेतला त्याकरिता कोणतीही घटना घडली नव्हती.

१८.          सदर साक्षीदाराने उलट तपासात दिनांक १४.०१.२०२४ रोजी तिने पोलीस ठाणे येवदा येथे बयाण दिले होते. तिचे वडिल तिच्या आईला लहानसहान गोष्टीवरून मारहाण करीत होते, आरोपी क्र २ व ३ आजी व आत्या तिच्या आईला मानसिक त्रास देत होते ही बाब नाकारली. दिनांक २९.१२.२०२३ रोजी सकाळी ९ वाजता तिच्या आई आणि वडिलांमध्ये भांडण झाले व तिच्या वडिलांनी तिच्या आईला खुप मारहाण केली होती ही बाब स्पष्टपणे नाकारली. तिने पुढे कथन केले की, सकाळच्या वेळी ती व तिचा भाउ

घरी हजर होते. त्यादिवशी ती सकाळी १० वाजता शाळेत गेली. तिने पुढे मान्य केले की, तिच्या आईला छोटु सरदार याने ऑटोत दवाखान्यात नेले होते. तिने तिच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ नाकारला. ती सदया तिच्या आजीसोबत राहायला आहे आणि तिची आत्या सुध्दा तिला सांभाळते.

१९. साक्षीदार क्र.५- रूद्र प्रेमदास रायबोले याने त्याच्या साक्षीत कथन केले की, आरोपीमध्ये एक त्याची आजी व एक आत्या आहे. मयत रेषमा ही त्याची आई होती व ती मनोरूग्ण होती. आईने गळफास घेतला या कारणाकरिता कोणतीही घटना घडली नव्हती.

२०. सदर साक्षीदाराने सुध्दा साक्षीदार क्र. ४ प्रमाणे आपल्या उलट तपासात त्याचे वडिल मयत आरोपी प्रेमदास आणि इतर आरोपी त्याची आजी व आत्या त्याच्या आईला त्रास देवुन मारहाण करीत होते ही बाब स्पष्टपणे नाकारलेली आहे. तसेच घटनेच्या दिवशी आरोपी मयत प्रेमदास आणि मयत रेषमा याच्यामध्ये भांडण झाले व तिला मारहाण करण्यात आली होती ही बाब स्पष्टपणे नाकारली.

२१. दोन्ही साक्षीदारांची साक्ष वाचली असता त्यामध्ये दोघांनीही मयत रेषमा ही मनोरूग्ण होती ही बाब मान्य केली आहे जेव्हा की फिर्यादी साक्षीदार क्र.१ व साक्षीदार क्र.३ याने सदरची बाब नाकारलेली आहे. दोन्ही साक्षीदार हे मयत रेषमाचे मुले असुन आपल्या आईला होणा-या त्रासाबाबत त्यांना माहिती असते परंतु त्यांनी स्वत: त्यांच्या पुराव्यात त्यांचे वडिल त्यांच्या आईला मारहाण करीत होते व लहान सहान गोष्टीवरून भांडण करीत होते ही बाब नाकारलेली आहे. त्यामुळे फिर्यादी म्हणते त्याप्रमाणे मयत रेषमाला खरोखरच त्रास होता किंवा कसे याबाबत संभ्रम निर्माण होतो.

२२. सदर मूद्दयाच्या अनूषंगाने मला याठिकाणी मा सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिवाडयाचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. ***Amalendu Pal @ Jhantu v. State of West Bengal, प्रदर्शित 1 (2009) 16 SCC rl.A.@S.L.P.(Crl.)No.7554 of 2019***

सदर प्रकरणात मा सर्वोच्च न्यायालयाने निर्देशित केले आहे की, कलम ३०६ अंतर्गत गून्हयाकरिता आरोपीला दोषी ठरविण्याकरिता न्यायालयाने प्रकरणातील तथ्ये आणि

परिस्थितीचा काळजीपूर्वक तपासणी केली पाहिजे. पिडीतेवर क्रुरता आणि छळामूळे पिडीतेला तिला जीव घेण्याशिवाय दूसरा कोणताही पर्याय राहिला नाही का, हे शोधण्यासाठी त्याच्यासमोर सादर केलेल्या पूराव्याचे मूल्यांकन केले पाहिजे. तसेच आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या कथित प्रकरणांमध्ये आत्महत्या करण्यास प्रवृत्त करण्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कृत्यांचा पुरावा असणे आवश्यक आहे. घटनेच्या वेळी आरोपीकडून कोणतीही सकारात्क कारवाई किंवा आत्महत्येस मदत करण्याकरिता काही विशिष्ट कृती करून सक्रिय भुमिका बजावली असावी, ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिवाडयाचे वाचन केले असता प्रस्तूत प्रकरणात साक्षीदार क्र. १ व २ यांच्या साक्षीत अशी कोणतीही बाब आली नाही जेणेकरून आरोपी यांनी रेषमा हिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले होते किंवा तिला झालेल्या छळामूळे पिडीतेला तिला जीव घेण्याशिवाय दूसरा कोणताही पर्याय राहिला नव्हता. तसेच मयत रेषमा हिच्यासोबत नेहमी राहणारे तिची मुले यांनी त्यांच्या पुराव्यात मयत रेषमाला तिच्या पतीकडुन कधी त्रास होता याबाबत कोणतेही कथन केले नाही.

२३. फिर्यादीची आई साक्षीदार क्र. १ आणि साक्षीदार क्र. २ मयतचा भाउ यांच्या म्हणण्याप्रमाणे जर मयत रेषमाला आरोपींकडुन त्रास होता तर त्यांनी त्याबाबत निश्चितच काही दखल घेतली असती. मयत रेष्मा हिच्या लग्नाला १४ ते १५ वर्ष पुर्ण झाली होती इतक्या वर्षापासुन जर तिला खरोखरच काही त्रास असता त्याबाबत ती ज्या ठिकाणी राहत होती त्या ठिकाणच्या आजुबाजुच्या लोकांना त्याबाबत माहिती असते. परंतू अभियोग पक्षाने कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही जेणेकरून रेषमाला आरोपींकडुन त्रास होता व त्या त्रासापोटी तिला तिचे जिवन संपविण्याशिवाय कोणताही पर्याय उरला नाही ही बाब शाबीत करता आली असती. तसेच सदर प्रकरणात अभियोग पक्षाने इतर कोणतेही साक्षीदार तपासले नाही. त्यामुळे सदर प्रकरणातील घटनास्थळ पंचनामा, शवविच्छेदन अहवाल, वैदयकीय प्रमाणपत्र शाबीत झाले नाही.

२४. एकंदरीत अभिलेखावर आलेला पुरावा पाहता अभियोग पक्ष आरोपींवर ठेवण्यात आलेले आरोप भारतीय दंड विधानचे कलम ४९८ आणि ३०६ सह कलम ३४

करिता लागणारे घटक पुराव्यानिशी शाबीत झाले नाही. त्यामुळे आरोपींना संशयाचा फायदा देणे संयुक्तिक ठरते. म्हणून मी मूद्दा क्र १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन परिणामी मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) **आरोपी क्र २ बेबी रामदास रायबोले आणि आरोपी क्र ३ पद्मा प्रकाश अभ्यंकर** यांची भारतीय दंड विधान कायदा कलम ४९८ अ आणि कलम ३०६ सह कलम ३४ या गून्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपींचे जामिनपत्र रद्द करण्यात येत आहे.

३) आरोपी याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) अन्वये रक्कम रू १५०००/- चा प्रत्येकी वैयक्तिक जात मुचलका व तेवढयाच रकमेचा लायक जामीनदार दयावा. सदरचे बंदपत्र ६ महिण्याचा कालावधी संपल्यानंतर संपुष्टात येईल.

४ ) सदर प्रकरणात मुद्देमाल जप्त करण्यात आले नसल्याने त्याविषयी कोणताही आदेश नाही.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)**

SATYAVAN TULASHIRAM DOKE
Digitally signed by SATYAVAN TULASHIRAM DOKE
Date: 2026.04.30 16:23:40 +0530

(सत्यवान तु. डोके )
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
दर्यापूर

**दिनांक :- ३०/०४/२०२६.**